५८३

दिनांक १ जानेवारी १९६४ पूर्वी सेवानिवृत्त होऊन/सेवेत असताना, मृत्यु पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या विधवांना कुटुंब निवृत्तिवेतन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

CR1984041601

वित्त विभाग

शासन निर्णय क्रं. पीईएन-१०८४/सी.आर.-४५४/एसईआर-४
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १९ एप्रिल १९८४
शासन निर्णय

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ यामधील नियम ११६-अनुसार, (एक) जे या नियमांखाली येतात आणि जे १ जानेवारी १९६४ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झाले आणि मृत्यूच्या तारखेस सेवानिवृत्तिवेतन घेत होते, किंवा (दोन) जे त्या तारखेनंतर सेवेत असताना मृत्यू पावले, अशा शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय आहे हा लाभ १ जानेवारी १९६४ पूर्वी सेवानिवृत्त होऊन/सेवेत असताना, मृत्यू पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या विधवांना अनुज्ञेय नाही. अशा शासकीय कर्मचाऱ्यांच्या विधवांना कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर करण्याचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधीन होता. १ जानेवारी १९६४ पूर्वी सेवानिवृत्त होऊन त्या तारखेपूर्वी किंवा त्यानंतर मृत्यू पावलेल्या तसेच त्या तारखेपूर्वी सेवेत असताना मृत्यू पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या विधवांना खालील अटींवर १ जानेवारी १९८४ पासून कुटुंब निवृत्तिवेतन दरमहा रुपये ६० (रुपये साठ) व त्यावर वेळोवेळी अनुज्ञेय असलेली वाढ मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे :-

(ए) १ जानेवारी १९८४ रोजी हयात असलेल्या विधवेलाच फक्त कुटुंब निवृत्तिवेतन देय असेल.

(बी) सेवानिवृत्त होऊन/सेवेत असताना मृत्यु पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला निवृत्तिवेतनाचे कोणतेही नियम लागू असले तरी, त्याच्या विधवेला कुटुंब निवृत्तीवेतन मिळेल,

(सी) ३१ डिसेंबर १९८३ रोजी अशा विधवेला सेवानिवृत्तिवेतनाच्या कोणत्याही नियमानुसार कुटुंब निवृत्तिवेतन किंवा राज्य शासनाकडून जिल्हा परिषदांकडून अथवा भारतातील इतर कोणत्याही शासनाकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मिळत असता कामा नये,

(डी) शासकीय कर्मचारी सेवेत असताना किंवा सेवानिवृत्त होऊन मृत्यू पावल्यावर त्याच्या विधवेने पुनर्विवाह केलेला असता कामा नये.

२. शासनाने असाही निर्णय घेतला आहे की, सेवेत असताना/सेवानिवृत्त होऊन मृत्यु पावलेल्या शासकीय कर्मचारी अखेरीस ज्या ठिकाणी सेवेत होता, तेथील कार्यालय प्रमुख हा अशा शासकीय कर्मचाऱ्याच्या विधवेला कुटुंब निवृत्तीवेतन मंजूर करण्यास सक्षम प्राधिकारी असेल. कुटुंब निवृत्तिवेतनाच्या मंजुरीसाठी आणि वितरणासाठी खालील पध्दतीचा अवलंब करावा :-

(एक) या निर्णयासोबत जोडपत्र १ म्हणून विहित केलेल्या नमुन्याच्या दोन प्रतीमध्ये शासकीय कर्मचाऱ्याच्या विधवेने जेथे तिचा पति अखेरीस काम करीत होता, तेथील कार्यालय प्रमुखाकडे अर्ज करावा,

(दोन) अर्ज मिळाल्यानंतर कार्यालय प्रमुखाने अर्जामध्ये नमूद केलेल्या तपशीलाची पडताळणी करावी व तो बरोबर असल्याबद्दल खात्री करून घ्यावी.

मुद्रण ... (कृपया मागे पहा)

मुद्रित पुणे क.

(तीन) नेहमीच्या पद्धतीप्रमाणे कोणत्याही प्रकारचे कुटुंब निवृत्तिवेतनाचे कागदपत्र तयार न करता कार्यालय प्रमुख या शासन निर्णयास जोडपत्र - २ म्हणून विहित केलेल्या नमुन्यामध्ये अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर करील.

मुंबई किंवा

(चार) विधवेकडून मिळालेला अर्ज (जोडपत्र-१) जोडपत्र-२ मध्ये दिलेल्या मंजुरीसह यथास्थिती, महालेखापाल (लेखा) महाराष्ट्र, नागपूर शाखा, नागपूर यांना पाठवून अर्जाची एक प्रत आपल्या अभिलेखासाठी कार्यालय प्रमुख ठेवून घेईल.

(पाच) कार्यालय प्रमुखाने दिलेले मंजुरीपत्र मिळाल्यानंतर यथास्थिती महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र मुंबई किंवा महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र नागपूर शाखा, नागपूर हे ज्या कोषागारामार्फत विधवा निवृत्तिवेतन घेऊ इच्छिते, त्या कोषागारात निवृत्तिवेतन प्रदान आदेश देऊन कार्यालय प्रमुखास व त्या विधवेस त्याप्रमाणे कळवतील.

(सहा) लेखा अधिकाऱ्याने दिलेल्या निवृत्तिवेतन प्रदान आदेशाची योग्य ती पडताळणी केल्यानंतर त्याच्या आधारे कोषागार अधिकारी विधवेस निवृत्तिवेतन प्रदान करील.

३/- जे शासकीय कर्मचारी आणि परिच्छेद ५ व ६ मध्ये नमूद केलेले कर्मचारी १ जानेवारी १९६४ पूर्वी सेवानिवृत्त झाले असून जे हयात आहेत, त्यांच्या पत्नीस निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूनंतर वर नमूद केलेल्या निर्णयानुसार कुटुंब निवृत्तिवेतन देय होईल.

४/- या शासन निर्णयाच्या परिच्छेद १ मधील निर्णयाचा लाभ भूतपूर्व मुंबई, हैद्राबाद आणि मध्यप्रदेश या राज्यातील खालील शासकीय कर्मचाऱ्यांच्या विधवांना सुध्दा देण्याचे शासनाने ठरविले आहे.

(ए) १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्यक्षेत्राचा आणि १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्यक्षेत्राचा भाग असलेल्या वरील राज्यांच्या कोणत्याही क्षेत्रात १ नोव्हेंबर १९५६ पूर्वी सेवेत असताना मृत्यू पावलेले शासकीय कर्मचारी.

(बी) १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्यक्षेत्राचा आणि १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्यक्षेत्राचा भाग असलेल्या वरील राज्यांच्या कोणत्याही क्षेत्रात, १ नोव्हेंबर १९५६ पूर्वी निवृत्त झालेले आणि १ नोव्हेंबर १९५६ पूर्वी मृत्यू पावलेले शासकीय कर्मचारी.

५/- या शासन निर्णयाच्या परिच्छेद १ व २ मधील निर्णयाचा लाभ मृत्यू पावलेल्या खालील सेवानिवृत्त व्यक्तींच्या विधवांना देण्याचेही शासनाने ठरविले आहे :-

(ए) १ मे १९६० ते ३० एप्रिल १९६२ (दोन्ही दिवस धरून) या दरम्यान स्थानिक संस्थांचे (पश्चिम महाराष्ट्रातील भूतपूर्व जिल्हा मंडळे व विदर्भातील डिस्ट्रिक्ट कौन्सिल / जनपद सभा) सेवानिवृत्त झालेले तसेच नगरपरिषदा व महानगरपालिका यांचे १ मे १९६० रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेले पूर्णकालिक प्राथमिक शिक्षक,

(कृपया मागे पहा)

४८५

-३-

(तीन) शासनाने यापूर्वी मंजूर केलेल्या तात्पुरत्या निवृत्तिवेतनपाठीस पात्र असलेले व १ मे १९६२ पूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत, असे पश्चिम महाराष्ट्रातील भूतपूर्व जिल्हा शिक्षण मंडळातील शिक्षकेतर कर्मचारी.

६/- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा अधिनियम क्रमांक ५) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्या संबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासनाने असेही ठरविले आहे की, या शासन निर्णयाच्या परिच्छेद १ व २ मधील निर्णयाचा लाभ मृत्यू पावलेल्या खालील निवृत्तिवेतनधारकांच्या विधवांनाही देण्यात यावा :-

(एक) १ मे १९६२ रोजी किंवा त्यानंतर म्हणजेच जिल्हा परिषदा अस्तित्वात आल्यानंतर सेवानिवृत्त झालेले जिल्हा परिषद निवृत्तिवेतनधारक व जिल्हा परिषदांचे सेवानिवृत्त प्राथमिक व माध्यमिक शिक्षक,

(दोन) १ मे १९६२ पूर्वी म्हणजे जिल्हा परिषदा अस्तित्वात येण्यापूर्वी सेवानिवृत्त झालेले भूतपूर्व स्थानिक संस्थांचे निवृत्तिवेतनधारक.

७/- कार्यालय प्रमुखांना विनंती करण्यात येते की, या शासन निर्णयासोबत जोडलेल्या जोडपत्राच्या पुरेशा प्रती पुनर्मुद्रित कराव्यात आणि कुटुंबनिवृत्तिवेतनाकरिता अर्जदारांना उपलब्ध करून द्याव्यात.

८/- यावाबत होणारा खर्च वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन ज्या लेखा शीर्षाखाली खर्ची घालण्यात येते त्या लेखा शीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्याखाली मंजूर केलेल्या अनुदानातून भागवावा.

९/- या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वं. दे. पानसे,
शासनाचे सहसचिव,

प्रति, मंत्रालयातील सर्व विभाग.

एम-२८५८४/-

*******************************************************************

क्रमांक लेखा ५१२/सी.आर. ६९८/स:
पुणे, दिनांक 30 -५-१९८४

प्रतिलिपी उपसंचालक भूमि अभिलेख पुणे / मुंबई / औरंगाबाद / नाशिक / अमरावती नागपूर, यांचेकडे, माहितीसाठी व मार्गदर्शना करिता सस्नेह सादर अग्रेषित.

[signature] 30/5

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, म. रा. पुणे यांचे करिता.

प्रत /- सर्व कार्यासन अधिकारी जमाबंदी आयुक्त पुणे कार्यालय / अभिलेखापाल.

प्रत - सर्व अ.भु.अ./ त्वि.अ.भु.अ./ ए.अ. यांना माहिती व मार्गदर्शनार्थ रवाना

सूचना :- जोडपत्र - २ (Annexure-II ) हे, जोडपत्र-१ ( Annexure-I ) च्या मागे चक्रमुद्रित केले गेले पाहिजे.

( शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पीईएन १०८४/सीआर- ४५४/एसईआर-४ दिनांक १६ एप्रिल १९८४ चे जोडपत्रे )

## जोडपत्र - १

## कुटुंब निवृत्तिवेतनासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

( १) अर्जदाराचे संपूर्ण नांव ..

( २) पतीचे नांव ..

( ३) मृत्यू पावलेला शासकीय कर्मचारी/निवृत्तिवेतन धारक, जेथे अखेरीस सेवा करीत होता ते कार्यालय / विभाग.

( ४) सेवा निवृत्तीचा दिनांक ..

( ५) मृत्यूचा दिनांक ..

( ६) निवृत्तीवेतन प्रदान आदेश क्रमांक व निवृत्तिवेतन- धारक जेथून आपले निवृत्तिवेतन घेत होता ते कोषागार/ उपकोषागार.

( ७) कुटुंब निवृत्तिवेतन जेथून घेण्याची इच्छा आहे त्या कोषागाराचे/ उपकोषागाराचे नाव.

( ८) सहपत्रे (विवक्षित नमुने सोबत जोडले आहेत )-

(एक ) अर्जदाराच्या यथोचितरित्या साक्षांकित केलेल्या दोन नमुना सह्या ( दोन प्रतीत सादर कराव्यात )

(दोन ) अर्जदाराच्या यथोचितरीत्या साक्षांकित केलेल्या छायाचित्राच्या पारपत्र आकाराच्या दोन प्रती.

* (तीन ) अर्जदाराच्या डाव्या हाताचा अंगठा व बोटांचे ठसे असलेल्या यथोचितरित्या साक्षांकित केलेल्या दोन चिठ्ठ्या.

(चार ) खालील गोष्टी दर्शविणारा अर्जदाराचा यथोचितरीत्या साक्षांकित केलेला वर्णनपट.

(ए) अर्जदाराचे . उंची, आणि

(बी) अर्जदाराचा चेहरा, हात इत्यादीवरील कोणत्याही वैयक्तिक खुणा (शक्य असेल तर किमान दोन ठळक खुणा दर्शवाव्यात. )

( दोन प्रती सादर कराव्यात. )

( ९) अर्जदाराची सही किंवा डाव्या हाताच्या अंगठ्याची निशाणी.

(१०) अर्जदाराचा सध्याचा संपूर्ण पत्ता ..

---

* अर्जदार स्वतःची सही करण्याइतपत साक्षर नसेल अशा बाबतीत सादर करावे.

(११) साक्षांकित करणाऱ्या व्यक्ती —

| | नांव | पूर्ण पत्ता | सही |
|---|---|---|---|
| (एक) | ---------------- | ---------------- | ---------------- |
| (दोन) | ---------------- | ---------------- | ---------------- |

(१२) साक्षीदार —

| | | | |
|---|---|---|---|
| (एक) | ---------------- | ---------------- | ---------------- |
| (दोन) | ---------------- | ---------------- | ---------------- |

---

टीप :- दोन राजपत्रित शासकीय कर्मचाऱ्यांनी किंवा अर्जदार ज्या शहरात, तालुक्यात किंवा गावात राहात असेल, तेथील दोन किंवा अधिक मान्यवर व्यक्तींनी साक्षांकित करावे.

---

## ANNEXURE - II.

### Form for sanctioning Family Pension.

The undersigned having satisfied himself about the correctness of the particulars given in the application, hereby orders the grant of Family Pension of Rs. 60/- ( Rupees Sixty only ) p.m. plus relief as admissible thereon sanctioned by Government from time to time to Smt.

with effect from 1st January 1984, in terms of G.R., F.D. No. PEN-1084/CR-454/SER-4, dated the 16th April 1984, which may be accepted by the Accounts Officer.

Place: Signature :

Date:

Name :

Designation of the Head of Office.

Office Seal :

aks/-